## सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३[1]

## [ महाराष्ट्र अनुसूचित जमातींच्या भोगवटदारांनी झाडांची विक्री करणे (नियमन) अधिनियम, १९६९ ]

**[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार यात दिनांक १८ एप्रिल १९६९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलेला ]**

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१* (१६-७-१९७४)†

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२‡ (४-८-१९८१)†

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६△£ (१४-२-१९९१)†

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (८-१-१९९६)†

## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या धारण जमिनींतील उभ्या झाडांच्या विल्हेवाटीचे नियमन करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या धारण जमिनीतील उभ्या झाडांच्या विल्हेवाटीचे नियमन करण्यासाठी व तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करणे आवश्यक आहे ;

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९६९ भाग-पाच असाधारण, इं. पृ. १३२ पहा.

* सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ७ द्वारे १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक पंधरा निरसित करण्यात आला.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

‡ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ४ द्वारे १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक अकरा निरसित करण्यात आला.

△सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५ द्वारे १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दोन निरसित करण्यात आला.

£ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याचे कलम ४ पुढीलप्रमाणे वाचावे.–

**सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याचे कलम ४ वगळल्यामुळे होणारे परिणाम.**

" **४.** (१) मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यावर, कोणत्याही संविदेच्या मान्यतेसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेले सर्व अर्ज खारीज केले जातील. **१९०४ चा मुंबई १.**

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या अर्जांना पोट-कलम (४) अन्वये मान्यता देण्यात आली असेल किंवा ज्यांच्या बाबतीत मुख्य अधिनियमाच्या कलम ४, पोट-कलम (५) च्या परंतुकाअन्वये पुरेशी किंमत देण्याबद्दल खरेदीदाराला भाग पाडणारा आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वीच्या कोणत्याही दिनांकाला काढण्यात आला असेल व असे अर्ज या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापर्यंत अद्याप प्रलंबित असतील त्या सर्व अर्जांच्या बाबतीत, या अधिनियमाच्या तरतुदी जणू काही अंमलात आल्या नव्हत्या असे समजून जिल्हाधिकाऱ्यांकडून त्यांवरील कार्यवाही चालू ठेवण्यात येईल व ते निकालात काढण्यात येतील. "

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांनी झाडांची विक्री करणे (नियमन) अधिनियम, १९६९ असे म्हणावे.

व्याख्या. (२) तो ३ मार्च १९६९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल. १९६६ चा महा. ४१

**२.** (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात–

(अ) "नेमलेला दिवस" म्हणजे ३ मार्च १९६९ ;

(ब) "संहिता" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ ;

[1][ (क) "जिल्हाधिकारी" या संज्ञेत, या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याची सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडण्यासाठी, राज्य शासनाने विशेषरीत्या अधिकार प्रदान केलेल्या तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकाऱ्याचा किंवा वन क्षेत्रपालाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या, वन अधिकाऱ्याचा समावेश होतो, आणि जिल्हाधिकाऱ्याची वेगवेगळी किंवा तीच कामे पार पाडण्यासाठी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करता येईल ; ]

[2][ (कअ) 'वन संरक्षक' म्हणजे, संबंधित मंडळाचा वन संरक्षक ; ]

१९२७ चा १६ (ड) "वन अधिकारी" म्हणजे भारतीय वन अधिनियम, १९२७ याच्या अर्थानुसार वन अधिकारी ;

(इ) "भोगवटादार" म्हणजे अनुसूचित जमातींतील भोगवटादार ;

(फ) "विहित केलेले" म्हणजे नियमाद्वारे विहित केलेले ;

(ग) "महसूल अधिकारी" म्हणजे महसूल अधिनियमाच्या अर्थानुसार महसूल अधिकारी ;

(ह) "अनुसूचित जमाती" म्हणजे भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जमाती म्हणून मानण्यात आल्या असतील अशा जमाती किंवा जनजाती समूह किंवा अशा जमातींचे किंवा जनजातींचे भाग किंवा त्यातील गट ;

[3][(आय) "झाडे" म्हणजे भोगवटादारांच्या धारण जमिनीतील कोणतीही झाडे ; ]

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग याचा अर्थ जमीन महसूल अधिनियमात त्यांना अनुक्रमे जो अर्थ नेमून दिला आहे तोच असेल.

---

[1]सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम २ द्वारे खंड (क) दाखल करण्यात आला.

२. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम २ द्वारे हा खंड दाखल करण्यात आला.

प्रतिबंध.

**३.** (१) कोणताही भोगवटादार नेमलेल्या दिवसानंतर, यापुढे उपबंधित केल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांचे [१] [***] सहाय्य घेतल्याखेरीज, आपल्या धारण जमिनीतील कोणत्याही झाडांची विक्री करणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन करून करण्यात आलेली झाडांची कोणतीही विक्री अवैध असेल आणि कोणतीही व्यक्ती झाडांची जी कोणतीही विक्री अवैध असेल अशा विक्रीस अनुसरून कोणतीही झाडे तोडणार नाही.

**४. [ झाडांच्या विक्रीसाठी केलेल्या पूर्वीच्या संविदा मान्य करून घेण्याची आवश्यकता ]** सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २ द्वारे वगळण्यात आले.

**५.** [२]**[ नेमलेल्या दिवसानंतर झाडांच्या विक्रीची कार्यपध्दती ]** सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ४ द्वारे वगळण्यात आले.

वन अधिकाऱ्यामार्फत [६][**] झाडांची विक्री करणे.

[३][ **६.** (१) महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटादारांनी झाडांची विक्री करणे (नियमन) (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभाच्या दिवशी आणि त्यानंतर आपल्या धारण जमिनीमधील कोणत्याही झाडांची विक्री करण्याचा ज्यांचा हेतू असेल असा कोणताही भोगवटादार, झाडांच्या विक्रीमध्ये सहाय्य करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करील. असा अर्ज विहित नमुन्यात असेल व त्यासोबत, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ याच्या कलम ३ अन्वये देण्यात आलेल्या परवानगीची, कोणतीही असल्यास, प्रमाणित प्रत जोडण्यात येईल व त्या अधिनियमाच्या कलम ३, पोट-कलम (१-क) अन्वये अशी परवानगी देण्यात आली असल्याचे मानण्यात आले असेल त्याबाबतीत, तशी वस्तुस्थिती अर्जात नमूद करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (१) खालील अर्ज मिळाल्यावर, जिल्हाधिकारी, अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, झाडांची विक्री करण्यासाठी मागणी करण्यात आलेले सहाय्य वन अधिकाऱ्यांमार्फत देण्यात यावे [४] [ किंवा नाही ] [५] [***] यासंबंधी निर्णय करील.

---

१. १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ३ द्वारे ''परवानगी किंवा'' हा मजकूर वगळण्यात आला.

२. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याचे कलम ४ पुढीलप्रमाणे वाचावे.–
''परंतु, कलम ५ वगळण्यापूर्वी झाडांची विक्री करण्यासाठी परवानगी देण्यात आली असेल त्या बाबतीत, हे कलम वगळण्यात आल्यामुळे, भोगवटादारांच्या धारण जमिनींमधील झाडे तोडण्यावर किंवा ती काढून नेण्यावर परिणाम होणार नाही.''

३. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ५ द्वारे कलम ६ दाखल करण्यात आले.

४. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३ (१) (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (ब) द्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ३ (४) द्वारे ''किंवा लिलावाद्वारे'' हा मजकूर वगळण्यात आला.

(३) असे सहाय्य देण्यासंबंधीचा निर्णय जिल्हाधिकाऱ्याने घेतला असेल तर, जिल्हाधिकारी अशा झाडांसाठी ज्यामुळे जास्तीत जास्त किंमत मिळेल अशाप्रकारे, राज्य शासन आदेशाद्वारे निदेश (विक्रीच्या संबंधात दिलेल्या ठेवींच्या रकमा जप्त करता येतील त्या परिस्थितीसंबंधी अशा निदेशात दिलेली तरतूद धरून) देईल अशारीतीने, याबाबतीत राज्य शासनाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या वन अधिकाऱ्यांमार्फत झाडांची विक्री करण्याची व्यवस्था करील. ]

[१] [ (४) **** ]

[२] [ (५) जिल्हाधिकारी झाडांच्या विक्रीच्या अगोदरचे अगाऊ रकमेचे प्रदान आणि विक्रीच्या उत्पन्नाचे प्रदान पुढील रीतीने करील :–

(अ) विक्री करावयाच्या झाडांच्या निव्वळ अंदाजित किंमतीच्या वीस टक्के एवढी रक्कम, पोट-कलम (२) अन्वये झाडांच्या विक्रीकरिता सहाय्य देण्यासंबंधीच्या निर्णयाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत चुकती करण्यात येईल ;

(ब) विक्री करावयाच्या झाडांच्या निव्वळ अंदाजित किंमतीच्या तीस टक्के एवढी रक्कम झाडे विक्री आगारामध्ये वाहून नेल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत चुकती करण्यात येईल ;

(क) खंड (अ) आणि (ब) अन्वये चुकती करण्यात आलेली रक्कम, विक्रीचा खर्च आणि करण्यात आलेला इतर खर्च वजा केल्यानंतर विक्रीचे उत्पन्न, झाडे विक्री आगारामध्ये वाहून नेल्याच्या तारखेपासून एकशेवीस दिवसांच्या आत चुकते करण्यात येईल ; ]

अपील

**७.** या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाद्वारे किंवा निर्णयाद्वारे हानी पोहोचलेल्या प्रत्येक व्यक्तीस, असा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, याबाबतीत विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल. विहित करण्यात येतील अशा कार्यपध्दतीच्या नियमांना अधीन राहून अपील प्राधिकाऱ्यास, अशा व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला न्याय्य आणि उचित वाटेल असा आदेश त्या अपीलावर देता येईल.

[१] [ **७अ.** [२] [(१) राज्य शासनास किंवा वन संरक्षकास स्वाधिकारे, किंवा व्यथित व्यक्तीने राज्य शासनाकडे किंवा वन संरक्षकाकडे केलेल्या अर्जावरून जिल्हाधिकाऱ्याने किंवा

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३ (२) द्वारे पोट-कलम (४) वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३(३) द्वारे पोट-कलम (५) दाखल करण्यात आले.

पुन-रीक्षण कोणत्याही वन अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाच्या किंवा आदेशाच्या वैधतेसंबंधी किंवा औचित्यासंबंधी किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या किंवा कोणत्याही वन अधिकाऱ्यांच्या कामकाजाच्या नियमिततेसंबंधी स्वत:ची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, अशा जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा वन अधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेल्या किंवा त्याच्याकडून निकालात काढण्यात आलेल्या कोणत्याही प्रकरणाच्या कोणत्याही चौकशीच्या किंवा कार्यवाहीच्या संबंधातील अभिलेख मागवून त्याची तपासणी करता येईल :

परंतु, ज्याचे पुनरीक्षण करण्याची मागणी करण्यात आलेली असेल तो निर्णय किंवा आदेश अर्जदाराला मिळाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यानंतर अर्ज केलेला असेल तर राज्य शासन किंवा वन संरक्षक असा कोणताही अभिलेख मागविणार नाही.]

(२) अशा रीतीने मागविण्यात आलेल्या कोणत्याही निर्णयात किंवा आदेशात किंवा कामकाजात फेरबदल करण्यात आला पाहिजे, ते विलोपित करण्यात आले पाहिजे किंवा ते प्रत्यावर्तित करण्यात आले पाहिजे असे राज्य शासनास किंवा [३][वन संरक्षकास] कोणत्याही बाबतीत दिसून येईल तर, राज्य शासनास किंवा [३] [ वन संरक्षकास ] त्यास योग्य वाटेल असा आदेश त्यावर देता येईल.

परंतु, राज्य शासन किंवा [३] [ वन संरक्षक ] संबंधित व्यक्तीस, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय अशा कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होईल असा, या कलमाखालील कोणताही आदेश देणार नाही.]

**कार्य-वाही हस्तां-तरित कर-ण्याचा अधि-कार.** [४] [ **७ब.** राज्य शासनाला कोणत्याही अधिकाऱ्यासमोर किंवा प्राधिकरणासमोर प्रलंबित असलेले, या अधिनियमाखालील कोणतेही अर्ज, अपिले किंवा इतर कार्यवाही सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, काढून घेता येईल व ती, अधिकारिता असलेल्या यथास्थिति, कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे, निकालात काढण्यासाठी हस्तांतरित करता येईल.]

---

१. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ६ द्वारे कलम ७ अ समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४(१) द्वारे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४(२) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ३ द्वारे कलम ७ ब समाविष्ट करण्यात आले.

शास्ती.

८. (१) कलम ३ अन्वये जी विक्री अवैध असेल अशा कोणत्याही विक्रीच्या अनुरोधाने [1][***] जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही धारणजमिनीतील कोणतीही झाडे तोडील किंवा हलवील अशी व्यक्ती, दोष सिद्धीनंतर सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि या अधिनियमाचे उल्लंघन करून तोडलेली झाडे, कोणतीही असल्यास, ती न्यायालयाच्या आदेशाद्वारे सरकारजमा करता येतील.

(२) दंडाधिकारी, अशा रीतीने लादण्यात आलेला सर्व दंड किंवा त्याचा कोणताही भाग भरपाई म्हणून भोगवटदाराला देण्यात यावा, असा आदेश देऊ शकेल.

अधिकारी लोकसेवक असणे.

९. या अधिनियमान्वये अधिकाराचा वापर करणारे किंवा कोणतीही कर्तव्ये किंवा कार्ये पार पाडणारे अधिकारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असे मानण्यात येईल.

पैसे भरण्यासाठी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी.

१०. या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याने जी कोणतीही रक्कम भरण्यासाठी निदेश दिले असेल अशी रक्कम, ती भरण्याविषयी ज्या व्यक्तिला आदेश दिला असेल त्या व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

कार्यवाही करण्यास रोध.

११. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, राज्य सरकारविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये अधिकाराचा वापर करण्यास किंवा कर्तव्ये पार पाडण्यास किंवा कामे करण्यास अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तिविरुद्ध कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करता येणार नाही.

या अधिनियमाचे उपबंध हे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधीच्या उपबंधाशिवाय आणखी असणे.

१२. या अधिनियमाच्या उपबंध झाडे तोडणास मनाई करणाऱ्या किंवा त्याचे नियमन करणाऱ्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीच्या उपबंधाशिवाय आणखी असतील आणि ते त्यांचे अल्पीकरण करणार नाहीत.

नियम करण्याचा अधिकार.

१३. (१) राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील.

(२) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशारीतीने ठेवण्यात आला

---

१. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील आणि असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून तो नियम यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

**१९६९ चा महा. अध्या. ५.** **१४.** (१) महाराष्ट्र अनुसूचित जमातींच्या भोगवटदारांनी झाडांची विक्री करणे (नियमन) अध्यादेश, १९६९ याद्वारे रद्द करण्यात येत आहे. **सन १९६९ चा अध्यादेश क्रमांक ५ रद्द करणे व व्यावृत्ती.**

(२) (अध्यादेश) अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (केलेले कोणतेही नियम धरून) या अधिनियमान्वये करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## (सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३)

# महाराष्ट्र अनुसूचित जमातींच्या भोगवटदारांनी झाडांची विक्री करणे (नियमन) अधिनियम, १९६९

(१ जानेवारी, २०१४ पर्यंत सुधारित)

## ( Maharashtra Act No. XXIII of 1969 )

# The Maharashtra Sale of Trees by Occupants belonging to Scheduled Tribes (Regulation) Act, 1969

**( As Modified upto the 1st January, 2014 )**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक,
शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१४

( किंमत : ----- रुपये )

# महाराष्ट्र अनुसूचित जमातींच्या भोगवटदारांनी झाडांची विक्री करणे (नियमन) अधिनियम, १९६९

## अनुक्रमणिका

**उद्देशिका :**

**कलमे :**

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. प्रतिबंध.

४. [ वगळले ]

५. [ वगळले ]

६. वन अधिकाऱ्यांमार्फत झाडांची विक्री करणे.

७. अपील.

७ अ. पुनरीक्षण.

७ ब. कार्यवाही हस्तांतरित करण्याचा अधिकार.

८. शास्ती.

९. अधिकारी लोकसेवक असणे.

१०. पैसे भरण्यासाठी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी.

११. कार्यवाही करण्यास रोध.

१२. या अधिनियमाचे उपबंध हे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधीच्या उपबंधाशिवाय आणखी असणे.

१३. नियम करण्याचा अधिकार.

१४. सन १९६९ चा अध्यादेश क्रमांक ५ रद्द करणे व व्यावृत्ती.